
पारावरच्या गप्पा

# हुमणीमुळे होतेय मोठे नुकसान...



सकाळचे देवदर्शन आटोपून संपत पारावर बसला होता. आज गणपतला यायला उशीरच झाला होता. घाईघाईने दर्शन घेऊन गणपत संपतच्या मांडीला मांडी लावून बसला. तसा गणपतकडे बघून संपत हसला व म्हणाला,

''कारं गंपा, आज काय झोप झालेली दिसत नाही. फारच उशीर केला यायला.''

त्यावर गणपत म्हणाला, ''तसं नाही रं संपा, आज येताना ऊसाच्या कडेला काही ऊस वाळलेला दिसला म्हणून थांबलो. ऊस हाताने सहज उपटून आला. मला वाटलं खाल्लं असेल बेट उंदरांनी! परंतु पुढे होऊन आतल्या बाजूला बघितलं तर ऊसाची आणखी काही बेटं वाळलेली दिसली. अरं संपा, जसंजसं मी आत घुसलो तसंतसं मात्र माझ्या काळजाचं पाणी झालं. आरं बाहेरून ऊस हिरवागार दिसत होता. परंतु आतमध्ये मात्र मोठ्या प्रमाणात ऊस वाळून गेला बघ! डोक्याला हातच लावून बसलो मी बांधावर. त्यामुळे यायला उशीर झाला. मला सांग संपा, यापूर्वी तर ऊसात उंदीर होते. परंतु अशा प्रकारचा ऊस मात्र कधी वाळला नाही. ऊसाच्या बेटाला हात लावला की लगेच उपसून येतो. आत ऊस वाळलेल्या बेटांचे असे मोठे प्रमाण आहे. मग हे नेमके कशामुळे झाले आहे संपा? मी ऊसाची परिस्थिती बघितल्यामुळे माझ्या तर तोंडचं पाणीच पळालं बघ!''

यावर संपत म्हणाला, ''अरं गंपा, ऊसाची बेटं वाळली ती उंदरांमुळे नाही तर हुमणीमुळे. आपण नाही का शेणखत उचलताना पांढरी मोठी अळी दिसते, तीच हुमणी. ही हुमणी पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे या जिल्ह्यांत अनेक वर्षांपासून ऊसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत असते. परंतु मागील काही वर्षांत तिचा प्रादुर्भाव इतरही जिल्ह्यांमध्ये वाढू लागलेला आहे. हुमणी ऊस खात नाही. ती फक्त ऊसाची मुळे कुरतडते. त्यामुळे ऊस वाळतो. हुमणीला जमिनीतील सेंद्रिय पदार्थ, काडीकचरा, वाळलेले पदार्थ आवडतात. त्यामुळेच शेणखताच्या उकिरड्यावर आपल्याला ही अळी जास्त दिसते. आपण आपल्या शेतामध्ये सेंद्रिय पदार्थ टाकण्याचे प्रमाण कमी केल्यामुळे आता या अळीला खायला काही नसल्यामुळे ती पिकाची मुळे खाते. त्यामुळे पीक वाळून ते सहजपणे उपटून येते. ही कीड फक्त ऊसावरच नाही तर इतरही पिकांवर हल्ला करते. अर्थात आजही याचे प्रमाण ऊसावर जास्त आहे.''

संपत बोलत असताना गणपतच्या चेहऱ्यावरील प्रश्न आणि गंभीरपणा वाढतच चालला होता. त्याने संपतला मध्येच थांबवून विचारले, ''मला हे सांग संपा, मी ऊसामध्ये आतपर्यंत घुसलो होतो. माझ्या दोन एकर ऊसापैकी फक्त काही भागामध्येच हुमणीमुळे ऊस वाळलेला आहे. म्हणजे ८-१० गुंठे ऊसाचे नुकसान असेल. बाकी ऊस मात्र हिरवागार आहे. तेथे ऊसाला काहीही इजा झालेली नाही. आता मला सांग संपा, माझ्या ऊसाच्या इतरही भागामध्ये हुमणीमुळे नुकसान होईल काय?''

संपतने गणपतच्या पाठीवर हात ठेवला व म्हणाला, ''हे बघ गंपा, हुमणीचा प्रादुर्भाव जून- जुलै महिन्यात सुरू होतो. खरं तर मे महिन्यातच शेवटी शेवटी ज्यावेळी वळवाचा पाऊस येतो त्यावेळी हुमणीचा भुंगा लिंबाच्या झाडावर असलेल्या पाल्यावर आपला उदरनिर्वाह करतो. रात्रीच्या वेळी लिंबाचा पाला खातो आणि जमिनीमध्ये जाऊन शेतामध्ये अंडी घालतो. एक भुंगा ५०० ते १००० अंडी घालतो. संध्याकाळी ७ ते ८ च्या दरम्यान या भुंग्यांचे झाडावरच मिलन होऊन मादी भुंगा जमिनीत अंडी घालते. सर्वसाधारणपणे झाडाच्या जवळ ही अंडी घातली जातात. या अंड्यांमधून १५ ते २० दिवसांत अळी बाहेर येऊन ही अळी जमिनीच्या वरच्या थरात राहून पिकाची मुळे कुरतडते. अळी जसजशी मोठी होईल तसतसे तिचे खाण्याचे प्रमाण वाढत जाते. सर्वसाधारणपणे ऊसाचे नुकसान आपल्या डोळ्यांना जुलैनंतर दिसते आणि ऑगस्ट- सप्टेंबरमध्ये हे

नुकसान मोठ्या प्रमाणावर वाढते. कारण तोपर्यंत अळी मोठी झालेली असते आणि तिचे खाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे नुकसान मोठे दिसते. म्हणून गंपा, तुला ऊसाची वाळलेली बेटं दिसली असतील. सर्वसाधारणपणे ऑक्टोबर- नोव्हेंबरनंतर ही अळी जमिनीच्या खालच्या थरामध्ये जाते आणि सुप्त अवस्थेमध्ये राहते. ही अळी जमिनीमध्ये मे महिन्यापर्यंत सुप्तावस्थेत राहून नंतर कोषावस्थेत जाते. जून महिन्यात कोषातून भुंगा तयार होऊन अंडी घालण्याचा क्रम सुरू होतो. अशा प्रकारे एका वर्षात या किडीचा जीवनक्रम पूर्ण होतो. म्हणून गंपा, जे काही नुकसान तुझ्या ऊसाचे झाले आहे तेवढेच नुकसान होईल. आता नवीन ऊसाची मुळे ही हुमणी खाणार नाही. त्यामुळे आता फार काळजी करत बसू नको.''

यावर गंपा जास्त चिडला व म्हणाला, ''म्हणजे तुला काय म्हणायचेय संपा, माझ्या ऊसाचे एवढे नुकसान होत असताना आता मी काळजी करू नको? हातावर हात धरून बसू काय मी? अरं काहीतरी हालचाल करावीच लागेल ना या किडीला मारायला; नाही तर परत तिची वाढ होईल!''

यावर मात्र संपा हसून म्हणाला, ''हे बघ गंपा. आता वरातीमागून घोडे यासारखा प्रकार करून चालणार नाही. तुला सांगितलं ना आता ही अळी जमिनीमध्ये खोलवर जाऊन सुप्त अवस्थेत राहणार आहे. त्यामुळे तू कितीही औषधे वापरली तरी ती मरणार नाही. आता मग आपण काय करायचे, जेणेकरून ही कीड पुन्हा आपल्या पिकाला खाणार नाही, त्यासाठी पुढील वर्षी उन्हाळ्यातच नियोजन करायचे. उन्हाळ्यामध्ये म्हणजेच एप्रिल- मे महिन्यात आपल्या शेताच्या कडेला असलेल्या लिंबाची झाडे डहाळावी, म्हणजे भुंग्यांना पाला खायला मिळणार नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे लिंबाच्या झाडाखाली जून महिन्यात संध्याकाळच्या वेळी लाईट लावावी जेणेकरून या लाईटकडे भुंगे आकर्षित होतील. या लाईटखाली प्लॅस्टिकचा ड्रम किंवा प्लॅस्टिक पेपरच्या सहाय्याने एक खड्डा तयार तयार करून त्यामध्ये रॉकेलमिश्रित पाणी ठेवावे. अशाप्रकारे संध्याकाळी ७ ते ८ च्या दरम्यान भुंगे गोळा करता येतील. लाईटची सोय नसेल तर झाडाच्या फांद्या हलविल्या तर भुंगे जमिनीवर पडतील. हे भुंगे गोळा करून त्यांचा नायनाट करावा. एक भुंगा आपण नष्ट केला तर २०० ते ४०० अळ्या नष्ट होतात आणि त्यामुळे आपण ऊसाच्या १०० ते २०० पेरांचे रक्षण करू शकतो. म्हणजे ऊसाच्या शेतात अळी मारत बसण्यापेक्षा भुंग्यालाच मारले तर खर्च कमी येईल आणि नुकसानपण होणार नाही. कारण हुमणीच्या नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशकांचा किंवा जैविक पद्धतीने नियोजन करण्याचा खर्च फार मोठा आणि अवघड आहे. अनेकदा या पद्धतीचा वापर करूनही आपण शेतातील हुमणी मारू शकत नाही. कारण एकतर ऊसामध्ये जाऊन वाळलेल्या बेटाजवळ औषध सोडणे शक्य होत नाही. ठिबकमधून औषधे सोडली तरी ती अळीपर्यंत पोहोचत नाहीत. पाण्यातून दिली तर औषधाच्या द्रावणाचा अंश अत्यंत कमी झाल्यामुळे त्याचा अळीवर काहीही परिणाम होत नाही. म्हणून वरातीमागून घोडे हा प्रकार करण्यापेक्षा सुरुवातीलाच भुंग्याचे नियोजन करणे हे सर्वात उत्तम.''

यावर मात्र गणपत मोठ्याने हसून म्हणाला, ''अरं वारं वा! म्हणजे मी माझ्या शेतातील भुंग्यांचे नियंत्रण करेल आणि माझ्या शेजाऱ्याने जर काही केले नाही तरी ते भुंगे माझ्या शेतावर येतील आणि पिकाचे नुकसान करतील. माझा शेजारचा तर टपूनच असतो की केव्हा माझ्या पिकाचे नुकसान होईल! अरं संपा, भाऊबंदकी फार वाईट असते रे बाबा!''

संपतला हसू आवरलं नाही. तो म्हणाला, ''हे बघ गंपा, मला माहीत आहे- मी सांगितले तसे करणं अवघड आहे. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन प्रयत्न करावा लागेल. साखर कारखान्यांनी यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. हुमणीमुळे २५ ते ३० टक्के ऊस उत्पादनात घट येते. त्यामुळे कारखान्याचेही मोठे नुकसान होते. म्हणून कारखान्याने यासाठी पुढाकार घेऊन मे-जून या दोन महिन्यांत हुमणी नियंत्रणाचे विशेष अभियान राबविले आणि यामध्ये सर्व शेतकऱ्यांना/ ऊस उत्पादकांना सहभागी करून घेतले तर चांगले यश येते. अशा प्रकारचा कार्यक्रम अनेक साखर कारखान्यांच्या माध्यमातून राबविला जातो. अरं गंपा, काही कारखाने हुमणीचे भुंगे २००- ४०० रुपये किलोप्रमाणे विकत घेतात. कारखाना क्षेत्रामध्ये १०-२० लाख रुपये खर्च केले तरी त्यापेक्षा जास्त फायदा कारखान्याचा होतो. प्रत्येक गावातील विविध भागांनुसार गट तयार करून अशा प्रकारचा उपक्रम राबविणे शक्य आहे. हुमणी आपल्याकडे आहे, फक्त पर्जन्यमान जास्त असेल तर प्रादुर्भाव कमी होतो. म्हणून दरवर्षी या प्रकारचा उपक्रम राबविला तर या समस्येपासून आपण दूर राहू.''

संपतच्या या सविस्तर माहितीमुळे गणपतचा जिवात जीव आला.

तो म्हणाला, ''संपा, मी ठरवलंय आतापासून शेजारच्या सोबत भाऊबंदकी न करता त्याला सोबत घेऊन या हुमणीचा नाश करायचाच. चल आजचा चहा माझ्याकडून...''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**

■